दिनांक २९/०६/२०२२

# प्रेसनोट

सज्जा कार्यालय संगेवाडी ता. सांगोला येथील तलाठी तसेच खाजगी इसम यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी गुन्हा दाखल बाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| गुन्हा नोंद क्रमांक | सांगोला पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, ७ (अ) प्रमाणे |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १. नारायण विठ्ठल खरात, वय ३६ वर्षे,व्यवसाय नोकरी, पद तलाठी सज्जा संगेवाडी अंतर्गत तहसिल कार्यालय सांगोला रा.मु.पो भांब पो.गिरवी ता.माळशिरस जि.सोलापूर<br>२.खाजगी इसम मयुर गुलचंद भोरे, वय २० वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. मु पो संगेवाडी ता.सांगोला जि.सोलापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०००/- |
| थोडक्यात माहिती | पडताळणी व सापळा दि २९/०६/२०२२<br>यातील तक्रारदार यांचे वडील हे मयत झाले असुन वडिलांचे शेतजमीनीवर वारसदार म्हणुन तक्रारदार, त्यांचा भाऊ व त्यांच्या आईचे नांव लागलेले आहे. सदर प्रकरणामध्ये तक्रारदार यांनी तहसिल कार्यालय सांगोला येथुन हक्कसोडपत्र तयार करुन त्यांचे वडिलांचे शेतजमीनीवर वारसदार म्हणुन केवळ त्यांचे आईचे नांव लागावे याकरीता विहीत अर्जासह हक्कसोडपत्र जोडुन सज्जा संगेवाडी येथे अर्ज सादर केला होता.<br>सदर प्रकरणामध्ये तक्रारदार हे त्या अनुषंगाने पाठपुरावा करीत असतांना यातील आरोपी क्र.०१ तलाठी खरात यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना हक्कसोड पत्रानुसार वारसदार म्हणुन शेतजमीनीवर तक्रारदार यांचे आईचे नांव लावण्याकरीता २०००/- रुपये लाचेची मागणी केली व सदर लाच रक्कम यातील आरोपी क्र.०२ खाजगी इसम भोरे यांचे मोबाईल क्रमांकाचे फोन पे खात्यावर पाठविण्याबाबत सांगितले होते.<br>सदर प्रकरणामध्ये पडताळणी कारवाई दरम्यान यातील आरोपी क्र.०१ तलाठी खरात यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर प्रकरणामध्ये सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी क्र.०१ तलाठी खरात यांनी रु २०००/- लाच रक्कम आरोपी क्र.०२ खाजगी इसम भोरे यांचेकडे देण्यास सांगितली असता आरोपी क्र.०२ खाजगी इसम भोरे यांनी ती स्विकारली असता दोन्ही आरोपीस रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे |
| सापळा पथक | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>श्री. चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>पोलीस अंमलदार- सोनवणे, सण्णके, पकाले, सुरवसे सर्व ने. अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **टोल फ्री क्रमांक- १०६४ वर किंवा पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर येथे** संपर्क साधावा.

**संकेतस्थळ -** www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल -** www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार** – acbmaharashtra.net

**दुरध्वनी क्रमांक**- ०२१७-२३१२६६८

**व्हॉटस ॲप क्रमांक** – ९९३०९९७७००

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो. सोलापूर.